# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 May 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात प्रचाराचे अवघे तीन दिवस शिल्लक – सभा आणि पदयात्रांना वेग
- विधान परिषदेच्या चार जागांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर–१० जूनला मतदान
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज दुसऱ्या टप्प्यातले पद्म पुरस्कार प्रदान करणार
- छत्रपती संभाजीनगर तसंच धाराशिव नामांतराविरोधातल्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्या

आणि

- हिंगोली जिल्ह्यात खासगी शेती पीक उत्पादक कंपनीच्या अधिकाऱ्याकडून हरभरा विक्रीत १३ लाखांचा अपहार

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात प्रचाराचे अवघे तीन दिवस राहिले असल्यानं, प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक सभा, बैठका, रोड शो, पदयात्रा आदींच्या माध्यमातून आपल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. चौथ्या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची काल जालना इथं महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ सभा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातल्या ८० कोटी गरिबांचा जीवनस्तर उंचावल्याचा दावा शहा यांनी केला. घरकुल, पेयजल, गॅस जोडणी, आयुष्मान भारत, कलम ३७०, अयोध्येतील राम मंदिर, तीन तलाक,

दहशतवादाचा बिमोड, आदीच्या माध्यमातून केलेल्या कामांचा त्यांनी आढावा घेतला. इंडिया आघाडीकडे नीती, नियत आणि नेता नसल्याची टीका त्यांनी केली. रावसाहेब दानवे यांच्याकडे येत्या काळात मोठी जबाबदारी देण्याचे संकेतही शहा यांनी या भाषणातून दिले.

****

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे नेहमीच किंगमेकरच्या भूमिकेत राहिले. त्यांच्यासमोर मुख्यमंत्रिपद नगण्य असल्याचं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. काल नाशिक इथं, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख विजय करंजकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला, त्यांचं स्वागत केल्यानंतर मुख्यमंत्री पत्रकारांशी बोलत होते.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्रातल्या मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची टीका केली आहे. अहमदनगरचे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ काल श्रीगोंदा इथं प्रचार सभेत ते बोलत होते.

दरम्यान, बीड मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची आज संध्याकाळी अंबाजोगाई इथं सभा होणार आहे.

****

भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर इथं महायुतीच्या उमेदवार डॉ. हिना गावित यांच्या प्रचारार्थ मेळावा घेतला. अहमगनगर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची काल धेवगाव तालुक्यातल्या बोधेगाव इथं सभा झाली.

****

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं विवेकानंद महाविद्यालयात चर्चासत्र घेतलं.

जालना लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार कल्याण काळे यांनी काल पिंप्रि राजा परिसरात सभा घेतली.

****

विधान परिषदेच्या जुलै महिन्यात रिक्त होणाऱ्या चार जागांचा निवडणूक कार्यक्रम, निवडणूक आयोगानं काल जारी केला. या चार जागांमधे मुंबई आणि कोकण विभागातल्या पदवीधर तसंच मुंबई आणि नाशिक विभागातल्या शिक्षक मतदार संघाचा समावेश आहे. मुंबई पदवीधर मतदार संघाचे विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदार संघाचे निरंजन डावखरे, मुंबई आणि नाशिक शिक्षक मतदार संघाचे अनुक्रमे किशोर दराडे आणि कपिल पाटील हे सदस्य येत्या सात जुलै रोजी निवृत्त होत आहेत. या निवडणुकीसाठी १५ मे पासून २२ मे पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. २४ मे रोजी अर्जांची छाननी होईल तर २७ मे रोजी उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. १० जून रोजी मतदान होणार असून, १३ जून रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यातले पद्म पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या आधी २२ एप्रिलला राष्ट्रपतींनी तीन पद्मविभुषण, आठ पद्मभूषण तसंच ५५ जणांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केले होते.

****

औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याच्या अनुक्रमे छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव अशा नामांतराच्या शासनाच्या निर्णयावरोधात दाखल केलेल्या याचिका, मुंबई उच्च न्यायालयानं काल फेटाळून लावल्या. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि न्यायमूर्ती अरीफ डॉक्टर यांनी हा निर्णय देताना, सरकारच्या नामांतराच्या निर्णयात बेकायदेशीर असं काही नसल्याचं सांगितलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाचं स्वागत करत, उच्च न्यायालयाचे आभार व्यक्त केले. काल छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलतांना, बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झालं असून, संभाजीनगर हे नाव सर्वप्रथम बाळासाहेब ठाकरे यांनीच दिलं होतं, याकडे शिंदे यांनी लक्ष वेधलं.

****

केंद्रीय लोकसेवा आयोग –यूपीएससी मार्फत घेतलेल्या इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस– आय.एफ.एस परीक्षेत, लातूरच्या प्रतिक्षा काळे यांनी महाराष्ट्रात पहिला तर देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. सध्या त्या मेळघाटात वन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा येत्या सहा जुलै रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातल्या एकूण ५२४ पदांचा सुधारित सविस्तर तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात सेनगाव इथल्या एका खासगी शेती पीक उत्पादक कंपनीच्या अधिकाऱ्याने, ११ शेतकऱ्यांचा २३२ क्विंटल हरभरा परस्पर विक्री करत, १३ लाखांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. सुरज प्रताप मोरे असं या अधिकाऱ्याचं नाव असून, १६ मे ते ११ सप्टेंबर २०२३ या कालावधीत नाफेडने या कंपनीमार्फत खरेदी केलेला हरभरा नाफेडकडे पोहोचवण्याऐवजी मोरे यानं त्याची परस्पर विक्री केली, त्यानुसार ही कारवाई करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बीड लोकसभा मतदार संघातल्या निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचं आजपासून १२ मे पर्यंत टपाली मतदान घेण्यात येणार आहे. या मतदार संघात घरोघरी मतदार चिठ्ठी वाटपाची कार्यवाही देखील सुरू झाली आहे.

****

बीड, जालना आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघात १३ मे रोजी मतदान होत आहे. मतदारांनी निर्भयपणे मतदान करण्याचं आवाहन जालन्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी केलं आहे.

> ***‘‘आपण सगळ्यांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, तसेच निर्भयपणे आपल्या मतदानाचा अधिकार बजावावा यासाठी प्रशासनाने पूर्णपणे तयारी केलेली आहे. सर्व मतदारांना मी आवाहन करतो, की मागच्या निवडणुकीच्या तुलनेमध्ये जास्तीत जास्त मतदान आपण यावेळेस करावं.’’***

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या मतदान केंद्रावर पाळणाघरांची सुविधा देण्यात येत आहे. त्यासाठी महिला आणि बालविकास विभाग सज्ज झाला असून, या पाळणाघरांसाठी पाळणे, खेळणी, बेबी फूड आदी साहित्य संकलित करणं सुरु झालं आहे.

दरम्यान, सर्व कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी विविध आस्थापनांनी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुटी द्यावी, असं आवाहन छत्रपती संभाजीनगर इथले कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत यांनी केलं आहे.

****

लातूर लोकसभा मतदार संघात सर्व सहा विधानसभा क्षेत्रातली मतदान यंत्रं लातूरच्या शासकीय महिला तंत्रनिकेतन इथल्या सुरक्षा कक्षात आणण्यात आले. निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार तसंच जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, यांच्या उपस्थितीत या कक्षांना सील करण्यात आलं.

दरम्यान, लातूर तसंच उस्मानाबाद लोकसभा मतदार संघात परवा झालेल्या मतदानाची अंतिम टक्केवारी आली आहे. लातूर इथं ६२ पूर्णांक ५९ शतांश टक्के तर उस्मानाबाद इथं ६३ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या वैजापूर तालुक्यात कमी पाऊस पडल्यामुळे अनेक गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातल्या धरणातून पिण्यासाठी पाणी सोडण्यात यावं, तसंच जनावरांना देखील पाणी, चारा उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी वैजापूर पंचायत समितीचे उपसभापती मनसुख झांबड यांनी केली आहे. या मागणीबाबत त्यांनी नुकतच जिल्ह्याधिकाऱ्यांना निवेदन दिलं.

****

नांदेड शहरात कुठेही पाणी टंचाई नसून फक्त जलवाहिनीच्या तांत्रिक बिघाडामुळे शहराचा पाणीपुरवठा काही दिवस विस्कळीत झाला होता. आगामी काळात नांदेड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी मुबलक प्रमाणात पाणी आरक्षित असून नागरिकांनी पाणीटंचाई बाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

लातूर जिल्ह्यात काल सायंकाळी पुन्हा एकदा अवकाळी पावसाने हजेरी लावली. अहमदपूर–चाकूर तालुक्यासह जिल्ह्यात इतरही काही भागात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला.

****